महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाची मागणी आणि सकल मराठा मोर्च्याची भूमिका एक चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठावाडा विद्यापीठ, नांदेड मानव्यविद्या शाखे अंतर्गत राज्यशास्त्र या विषयातील पिएच.डी. संशोधनासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

संशोधक

जाधव संतोष दत्तराम

एम.ए. (राज्यशास्त्र) बि.एड. सेट

मार्गदर्शक

प्रा.डॉ. एल.बी. डोंगरे

एम.ए. पिएच.डी. नेट

सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर

मार्च : २०२२

महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाची मागणी आणि सकल मराठा मोर्चाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :

भारतीय जाती व्यवस्था हि भारतीय समाजाची पायाभुत व्यवस्था आहे. प्राचिन भारतामध्ये या व्यवस्थेचा विकास झाला. वर्णव्यवस्थेमध्ये चार प्रमुख वर्ण मनुस्मृतीसारख्या ग्रंथामध्ये उल्लेखलेले सामाजीक वर्ग आहेत. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र, ब्राम्हण, यापैकी ब्राम्हण हे याजक विव्दान शिक्षक आहेत. क्षत्रीय हे राज्यकर्ते योद्धे आणि प्रशासक आहेत. वैश्य हे शेतकरी व्यापारी होते. आणि शुद्र हे मजुर किंवा वरील वर्गाची सेवा करणारा वर्ग होता. वरील चारपैकी एका वर्णाला किंवा समुदायाला सवर्ण म्हणतात. आज हे सवर्ण प्रगत वर्गात मोडतात. वर्ण व्यवस्था हि काळानुरुप बदलत गेली आहे. ह्या व्यवस्थेतील मोठी संरचनात्मक स्थित्यतंरे ब्रिटीश साम्राज्याच्या काळात हया व्यवस्थेला मात देण्यासाठी आज या भारतीय समाजामध्ये राजकिय शैक्षणिक आणी सामाजीक पातळयावर आरक्षणाची व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. जाती व्यवस्था दोन भिन्न संकल्पनातुन बनलेली आहे. वर्ण व्यवस्था आणी जाती व्यवस्था वास्तविक पाहता ह्या सामाजीक स्तरीकरण विश्लेषणासाठी वापरल्या जाणाऱ्या दोन वेगवेगळया व्यवस्थाशी जोडली गेली. एका विशिष्ठ व्यवस्थावरुन जातवर्ग स्पष्ट होता शिवकाळात हि जातप्रथा होती पण छत्रपती शिवाजी महाराजांनी तिला गुणवत्तेच्या दृष्टीकोणातुन पाहिले . महाराजांच्या सैन्य व्यवस्थेत अनेक प्रमुख पदि सामान्य जातीतील माणसे होती पुढे ब्रिटिशाचा काळात ह्याच सामाजीक स्थीत्यंतराचे त्यांनी आणलेल्या प्रशासकीय व्यवस्थेमध्ये स्थिर जाती घडविण्यामध्ये रुंपातर झाले. 1860 ते 1920 च्या दरम्यान ब्रिटिशांची भारतीय समाजाला वेगवेगळे मांडायला सुरूवात केली गेली. त्यातुन प्रशासकीय पदे आणी कामे हि फक्त उच्च जातीतील लोंकांना देण्याचा पायंडा त्यांनी पाडला. त्याचे परिणाम स्वरुप 1920 साली मोठ्या प्रमाणात भारतीय समाजातुन विरोध झाला. आणी यापुढे ब्रिटिशांनी नोंकऱ्यावर काही पदावर आणी एकुण पदातील काही पदे खालच्या जातीच्या लोंकांना द्यायला सुरूवात केली. आणि आरक्षणाची सुरूवात केली.

आरक्षणाचा इतिहास पाहता भारतात त्यांची सुरुवात. 1882 मध्ये हंटर कमीशनच्या स्थापनेपासुन भारतात आरक्षणाला सुरूवात झाली.सुप्रसिद्ध समाज सुधारक महात्मा ज्योतीबा फुले यांनी सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण व तसेच ब्रिटीश सरकारी नौकऱ्यांमध्ये मागास समाजासाठी आरक्षणाची मागणी केली. 1909 मध्ये छत्रपती शाहु महाराजानी आपल्या संस्थानामध्ये मागास वर्गासाठी आरक्षण लागू केले. भारतातील नैराश्य ग्रस्त वर्गाच्या कल्याणासाठी आरक्षण प्रदान करण्याचा पहिला सरकारी आदेश आहे. शाहु महाराजानी सामाजीक सुधारण्यासाठी आरक्षण लागु केले.

भारताच्या इतिहासात धार्मीक आधारावर आरक्षणाची सुरुवात. 1909 च्या मोर्ले मिटों सुधारणा कायदयाने केली गेली. या कायदयाने, धार्मीक आधारावर आरक्षण दिले गेले. 1931 या दुसऱ्या गोलमेज परिषदेमध्ये. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी दलींतासाठी वेगळया मतदार संघांची मागणी केली. 1932 मध्ये महात्मा गांधी आणि डॉ.बि.आर.आंबेडकर यांच्यामध्ये पुणे करार होऊन वेगळया मतदार संघाऐवजी केंन्द्र व राज्य विधीमंडळामध्ये लोकसंख्याच्या आधारावर दलितांना आरक्षण दिले गेले. 1932 मध्ये ब्रिटीश मंत्री रॅम्से मॅकडोनाल्ड यांच्या 'कम्युअल अवॉर्ड' च्या आधारे धार्मीक आरक्षणाला बळ मिळाले. आणि 1935 च्या भारत सुधारणा कायदयाने अनेक वर्गाना विशेष आरक्षण दिले गेले. भारतातील मुळ संविधानामध्ये सविधान कलम 334 आधारे आरक्षणाची व्यवस्था केली आहे. भारतीय सविधांनामध्ये आरक्षणाबाबत आर्थीक निकषाचा उल्लेख केला गेला नाही. तर, समाजामध्ये समानता आणण्यासाठी आरक्षण लागु केले गेले आहे. या आधारावर 1950 मध्ये मद्रास राज्यामध्ये मेडीकल आणि इंजिनिअर कॉलेजमध्ये विविध जातीसाठी आरक्षणाची तरतुद केली गेली होती. पण, चम्पांकम दोराईरंजन वाद नुसार सर्वोच न्यायालयाने त्याला सविधान 15 (1) चे उल्लघंन मानले. आरक्षणाची न्यायालयीन स्थीती पाहता 1951 मध्ये पहिल्यांदा संविधान दुरुस्तीव्दारा शैक्षणीकदृष्टया मागास वर्गासाठी विशेष प्रावधान म्हणून सविधानात. कलम 15 (A) जोडल्या गेले. 93 वे संशोधन दुरुस्ती नुसार 2005 15 (5) प्रावधान जोडुन सामाजिक आणि शैक्षणीक दृष्टीने मागास वर्गासाठी शिक्षण संस्थेत प्रवेशा संदर्भात आरक्षण दिले गेले. वर्तमान काळात सविधान अनुच्छेद 16 भाग 4 मध्ये सामाजिक तसेच शैक्षणीक दृष्टीने मागास वर्गासाठी पदनियुक्तीकरिता विषेश कायदा करण्यांत आला.

काका कालेलकर आयोग – विशेष मागास वर्गामध्ये कोण येऊ शकतो याच्या निश्चितीसाठी 1953 मध्ये काका कालेलकर यांच्या अध्यक्षेतेखालील पहिल्यांदा विशेष मागास आयोगाची स्थापना केली. पण त्या आयोगाच्या शिफारशी लागू केल्या गेल्या नाहीत. त्यांच्या नंतर 1978 मध्ये बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या अध्यक्षेतेखाली एका नव्या आयोगाची स्थापना केली गेली. या आयोगाच्या शिफारशी ह्या 1993 साली सर्वोच्च न्यायालयाच्या इंदिरा साहनी खटल्यात मंडळ शिफारशीवर आधारीत ओबीसीचे 27 टक्के आरक्षण वैध ठरवले गेले. अनुसुचीत जातीचे पंधरा टक्के अनुसुचित जमातीसाठी असलेले साडेसात टक्के आरक्षण या मुळे आरक्षणाची एकुण टक्केवारी 50 टक्के झाली. अश्या स्थितीत उच्चवर्णीयातील मागासलेले घटक जेंव्हा आरक्षण मागु लागले. तेंव्हा ओबीसीच्या मनात भिती निर्माण होणे स्वाभाविक होते अनूसुचित जाती आणि अनुसूचीती जमातीचे आरक्षण जन्माधीष्टीत आहेत तर ओबीसीचे आरक्षण " वर्ग " निकषावर आधारीत आहे. " वर्ग" हि संकल्पना काळानुरूप बदलत असते. याचा अर्थ असा होतो कि जो वर्ग आज मागासलेला आहे. तोच वर्ग काही काळाने मागासलेला असेलच असे नाही. याचाच व्यवहारीक अर्थ असा कि ओबीसीची आरक्षणाची यादि तयार केलेली आहे. ती स्वभावत: लवचिक आहे. आपल्या आरक्षणाला सरकारने हात लावू नये म्हणुन ओबीसी नेते आक्रमक झालेले आहेत. सरकारला यामुळे वेगळा विचार करावा लागला. 50

टक्के पेक्षा जास्त आरक्षण देता येत नाही आणि असंख्य नवे गट आरक्षण मागत आहेत. महाराष्ट्रातील मराठा गुजरात मधील पटेल आणि, आंध्रप्रदेशातील मुस्लीमांना आरक्षण जाहीर केले गेले. पण, अपेक्षेनुसार सर्व निर्णयाला न्यायपालीकेत आव्हान दिले गेले. न्यायपालीकेने सर्व निर्णय घटनाबाह्य ठरवुन ते रद्द केले. मात्र यातील न्यायपालीकेचे घटनात्मक भुमीका समजुन घेऊन आरक्षण उपलब्ध करुन देणे न्यायव्यवस्थेचे समोर आव्हान उभे केले आहे.

मराठा आरक्षणाचे अभ्यासक वरीष्ठ पत्रकार संजय मिस्कीन म्हणतात. "मराठा आरक्षणाचा इतिहास खऱ्या अर्थाने 1981 मध्ये माथाडी कामगार नेते अण्णासाहेब पाटील यांनी सुरु केला. त्याअगोदर मराठा समाज आरक्षणाच्या संघर्षात कधीही सहभागी नव्हता. मागासले पण असले तरी मागास म्हणून घेणे हे या समाजाला कमीपणाचे वाटत होते पण आर्थिक परिस्थीती आणि गावकारभाराचे पुढारीपण, यामध्ये फारकत करणे या समाजाला जमत नव्हते.

22 मार्च 1982 ला अण्णासाहेब पाटील यांनी मुबईत मराठा आरक्षणासह इतर 11 मागण्यासाठीचा पहिला मोर्चा काढला. बाबासाहेब भोसले हे तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते.

मिस्कीन च्या मते :

मराठयाचा हा मोर्चा पाहुन सरकारला समस्याची जाणीव झाली. आणि मराठा आरक्षणाचा निर्णय जाहिर करु अशी ग्वाही दिली पण दुर्दैवाने सरकार बरखास्त झाले आणि आरक्षणाचा निर्णय रद्द झाला. दुसऱ्याच दिवशी अण्णासाहेब पाटील यांनी समाजासमोर जाऊन काय उत्तर देऊ. या स्वाभिमानाने स्वत:चा बळी दिला. तेंव्हापासुन मराठा समाजाच्या संघटित बांधणीला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली.

मराठा आरक्षणाबाबत नेमलेले आयोग

ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीलाच केन्द्र सरकारने मंडळ आयोगाच्या शिफारशीनुसार इतरमागास म्हणजे ओ.बि.सी. ना आरक्षण दिले कुठल्याही जातीचा इतर मागासवर्गीय यामध्ये समावेश करण्यासाठी मंडळ आयोगाने काही मर्यादा घालुन दिल्या महाराष्ट्रात 1995 साली स्थापना झालेल्या पहिल्या मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष न्यायमुर्ती खत्री यांच्याकडे ज्यावेळी मराठा आरक्षणाचा प्रश्न आला त्यांनी 2000 साली आपला अहवाल सादर केला.

ज्या पोटजातीची नोंद मराठा - कुणबी, कुणबी - मराठा अशी आहेत त्यांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देऊ शकता. आयोगाच्या या शिफारशीमुळे मराठयांमध्ये काहीना ओ.बी.सी. मध्ये प्रवेश

मिळाला मात्र ज्या मराठयाच्या मागे किंवा पुढे कुणबी असा उल्लेख नाही त्यांची ओ.बी.सी मध्ये वर्गवारी झाली नाही. त्यामुळे नंतर मराठा आरक्षणाचा प्रश्न न्यायमुर्ती आर.एम. बापटच्या अध्यक्षतेखाली आयोगाकडे आला. न्या. बापट आयोगाने महाराष्ट्रात सर्वेक्षण करुन 2005 साली आपला अहवाल सादर केला. मराठा समाजाला इतरमागास वर्गात समाविष्ट करण्यास या आयोगाने नकार दिला.

बापट आयोगानंतर महाराष्ट्रातील मराठा संघटना आक्रमक झाल्या आणि आंदोलने सुरु झाली. त्यामुळे मग तत्कालीन आघाडी सरकारने 21 मार्च 2013 रोजी राणे समीतीची स्थापना केली. या समितीला सिध्द करायचे होते कि राज्यातील मराठा समाज हा शैक्षणीक आणि सामाजिक दृष्टया मागास आहे. कारण मराठा समाज मागास आहे हे सिध्द केल्याशिवाय मागासवर्गाचे फायदे समाजाला मिळणार नव्हते.राणे समितीने राज्यात फिरुन तज्ञांशी चर्चा करुन ताबडतोब तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचेकडे अहवाल सादर केला. मराठा आणि कुणबी समाज एकच आहे आणि ज्याप्रमाणे कुणबी समाजाला आरक्षण आहे त्याप्रमाणेच मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे अशी शिफारस राणे समितीच्या अहवालात करण्यात आली.

“नौकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मराठा समाजाला 16 टक्के आरक्षण आणि मुस्लीम समाजास 4 टक्के आरक्षण देण्याची शिफारस राणे समितीने केली. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण सरकारने. या शिफारशी 25 जुन 2014 रोजी झालेल्या मंत्रीमडळ बैठकीत मान्य केल्या”.राणे समितीच्या अहवालानुसारच हे आरक्षण लागु करण्यासाठी 9 जुलै 2014 रोजी राज्यघटना कलम 15 (4) 15 (5), 16 (4) नुसार शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टया मागास (SEBC) प्रवर्ग तयार करण्यात आला. SEBC म्हणजे समाजिक शैक्षणिक दृष्टया मागास प्रवर्ग होय. विधिक्षेत्रातील तज्ञ ॲन्ड रॉकेश सागतांत “ socially and. Educationly backword. Class” या प्रवर्गाचा उल्लेख राज्यघटनेत आहे. घटनेच्या 16 कलमात राज्यशासनाला जो समाज सामाजिक आणि शैक्षणीक दृष्टया मागास वाटला तर त्याला आरक्षण देण्याचा अधिकार राज्यसरकारला आहे. या सामाजिक आधारे मराठा समाजाला आरक्षण जाहीर केले गेले.“ राज्यघटना तयार होतांना संविधान समितीचे अध्यक्ष टि.टि. कृष्णामाचारी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मागासवर्ग म्हणजे काय? असा प्रश्न विचारला होता. त्यांच्या उत्तरादाखल डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले अनुसुचीत जाती आणि जमातीशिवाय अनेक राज्यात असे घटक आहेत कि जे यांच्याइतकेच मागास आहेत. मात्र यांचा समावेश अनुसुचित जाती, जमातीमध्ये करण्यात आला नाही.”2014 साली मराठा समाजाला आरक्षण मंजुर होताच या निर्णयाला माहिती अधिकार कार्येकर्ते केतन तिरोडकर व इतरांनी मुंबई उच्चन्यायालयात आव्हान दिले. दरम्यानच्या काळात. महाराष्ट्र विधानसभा निवडणुका झाल्या आणि सत्तातरे झाली राज्यात भाजपाचे सरकार आले. कोर्टात मराठा आरक्षणाच्या अहवालाला आवाहन देणारा खटला सुरू होता. 14 नोव्हेंबर 2014 रोजी मुंबई उच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाच्या निर्णयाला स्थगीती दिली. दुसऱ्या दिवशी

महाराष्ट्र सरकारने सुप्रीम कोर्टात आव्हान देण्याचे ठरवले. मात्र सुप्रीम कोर्टाने हि स्थगीती उठविण्यास नकार दिला.

तर दुसरीकडे अहमदनगर जिल्हात कोपर्डी घटनेने राज्यात मराठा समाजात उद्रेक निर्माण झालेला होता. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, मराठा समाजातील नोकऱ्या, उच्च शिक्षणातील संधी तसेच शासकीय सोयीसुविधा न मिळत असल्यामुळे मराठा तरूणामध्ये नैराश्याचे वातावरण तयार झाले होते. मराठा समाजाच्या मनातील हा उद्रेक सकल मराठा मोर्चाचा माध्यामातून दिसुन आला. औरंगाबाद (संभाजीनगर) येथे सकल मराठा मोर्चाचा समन्वयकांनी कोपर्डी घटनेच्या निषेधार्थ सकल मराठा मुक मोर्चाचे आयोजन केले. या मोर्चाला उत्सुर्फ प्रतिसाद देत अपक्षेपेक्षा जास्त समाजबांधवानी गर्दी केली. हा मोर्चा 9 ऑगस्ट क्रांती दिनाच्या औचित्यसाधुन आयोजित केला होता. पुढे या मोर्चाचा प्रचार व प्रसार संपूर्ण महाराष्ट्र भर पसरला 9 ऑगस्ट 2016 ला सुरू झालेल्या पहिल्या मोर्चा पासुन प्रेरित होऊन महाराष्ट्रात परभणी, कोल्हापुर, सोलापुर, सांगली, सातारा, जळगांव, नांदेड, नागपुर, ठाणे, मुंबई, सह संपूर्ण महाराष्ट्रात एकुण 58 मोर्चे निघाले. या मोर्चाचे विशेष म्हणजे लहान मुले, स्त्रिया, जेष्ठ नागरिक, कधि न बाहेर पडणारा मराठा समाज लाखोंच्या संख्येने मुकमोर्चात सामिल होऊन शांतता, सहकार्य याचा एक नवा आदर्श राष्ट्राला दाखवून दिला. विशेषत: या मोर्चाचे कोणीही नेतृत्व नव्हते, नेते नव्हते, मुलीच्या हातुन सरकारला निवेदने दिली जात होती. सभेमध्ये बसण्यासाठी व्यासपीठ खुर्चा न ठेवता सर्व सकल समाज खाली बसुन या मोर्चाचे सामुहिक नेतृत्व स्विकारत होते. या मोर्चाच्या प्रमुख मागण्या पुढिल प्रमाणे. 1. कोपर्डी बलात्कार, खुन प्रकरणातील आरोपींना शिक्षा व्हावी. 2. शिक्षण आणि सरकारी नौकऱ्यामध्ये मराठयांना आरक्षण मिळावे. 3. अट्रॉसिटी (अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा) रद्द व्हावा अथवा अटी शिथील कराव्यात. 4. डॉ. एम.एस. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी मान्य करुन त्या लागू कराव्या. या विविध मागण्यासह सकल मराठा समाजाने राज्यभर शांततेत शिस्तबद्ध सरकार विरोधी प्रदर्शने केली. 9 ऑगस्ट 2017 मुंबई येथिल आझाद मैदाना वरिल मोर्चाने त्याची सांगता झाली. उच्च न्यायालयात सुरु असलेला मराठा आरक्षणाचा विषय राज्य मागासवर्ग आयोगाकडे पाठवण्यात आला. मागासवर्ग आयोगाने मराठा आरक्षणाचा दृष्टीने सर्वेक्षण, सुरू केले. पण 2017 साली आयोगाचे अध्यक्ष, न्या. मुर्ती एस. बि म्हसे यांचे निधनानंतर त्यांचे जागी न्या. एम. जी. गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली.

न्या. गायकवाड समिती ने 15 नोव्हेंबर 2018 रोजी आपला अहवाल सादर केला. त्यातील नोंदी कोर्टातही महत्वाचा मानल्या गेल्या. यांतील तीन शिफारशी मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी 2018 मध्ये हिवाळी अधिवेशनाचा पुर्व संध्येला मंजूर केल्या. 1. मराठा समाज हा सामाजिक आणी शैक्षणीक मागासप्रवर्ग घोषीत केल्यामुळे हा समाज राज्यघटनेच्या कलम. 15 (4) 16(4) मधील मध्ये

तरतुदिनुसार आरक्षणाचे फायदे घेण्यास पात्र ठरणार आहे. 2. मराठासमाज सामाजीक आणी शैक्षणीक मागास प्रवर्गात घोषीत केल्यामुळे आणी त्या अनुषंगाने उदभवलेल्या असाधारण आणि अपवादात्मक परिस्थीतीमुळे भारतीय राज्य घटनेचा आधीन राहुन राज्यशासन या प्रश्नी आवश्यक तो निर्णय घेऊ शकेल. 3. मराठा समाजाला सामाजीक आणि शैक्षणीकदृष्टया मागास (SEBC) याप्रवर्गात आरक्षण देण्यात येईल अशी घोषणातहि मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी केली. न्या.गायकवाड आयोगाच्या अहवालातील शिफारशीनुसार, फडणवीस सरकारने मराठा आरक्षणासाठी विधी मंडळात कायदा ही समंत करुन घेतला. फेब्रुवारी ते मार्च 2019 दरम्यान मुंबई उच्च न्यायालयात मराठा आरक्षणावर सुनावणी सुरु झाली. त्यावेळी न्याय.गायकवाड अहवाल महत्वाचा ठरला. 27 जुन 2019 रोजी मुंबई उच्च न्यायालय या खटल्यात अंतिम निकाल जाहिर झाला. आणि त्यात मराठा आरक्षणाचा निर्णय वैध ठरला. सरकारचा 16 टक्के आरक्षणाचा मागणीत मात्र मुंबई उच्चन्यायालयाने न्यायमुर्ती गायकवाड आयोगाचा अहवालानुसार बदल करुन. नौकऱ्यात 13 टक्के शिक्षणात 12 टक्के आरक्षण दिले गेले. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा राज्यसरकारचा कायदा घटनेचा आणि कायद्याच्या चौकटीत असल्याचे मत न्यायालयाने नोंदवले. असाधारण स्थितित कोणालाही समाजाचे मागासलेपण सिद्ध झाल्यानंतर त्या समाजाला आरक्षण देण्याचा राज्यसरकारला अधिकार आहे. आणी केंद्र सरकारने 14 ऑगस्ट 2018 रोजी केलेली 102 वी घटनादुरुस्ती यात आड येत नाही. असेही निरिक्षण न्यायालयाने नोंदवले त्यानंतर मराठा आरक्षणाच्या वैधतेवर प्रश्न उपस्थीत करत. ॲड. जयश्री पाटील यांनी सुप्रीम कोर्टात याचीका दाखल केली. दि. 05 मे 2021 रोजी न्यायमुर्ती अशोक भुषण सह पाच न्यायाधिशाच्या खंडपीठाने इंदिरा साहनी 1992 चा निवाडा आरक्षणाची 50 टक्के ची मर्यादा तसेच, न्यायालयाने गायकवाड समितीचा अहवाल महाराष्ट्र राज्य, शैक्षणीक दृष्टया आणि सामाजीक दृष्टया मागास वर्गांना कायद्यानुसार आरक्षण देणे अमान्य असल्याचे सांगीतले. त्यामुळे एकत्रीत 50 टक्याहुन अधिक वाढवुन दिलेले आरक्षण रद्द केले गेले.

या पार्श्वभुमीवर महाराष्ट्र सरकार सकल मराठा समाज, विधीतज्ञ विनोद पाटील व राजकिय नेते आणि उपेक्षित मराठा समाज मोठ्याप्रमाणावर आरक्षणाची गरज प्रतिपादित करीत आहे. याच अनुषंगाने मराठा आरक्षण मागणीच्या दरम्यान कोर्टाची स्थगीती मिळाल्यामुळे मराठा तरुणांमध्ये नैराश्याचे प्रमाण वाढून आत्महत्या करू लागले. मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुणच औरंगाबादमधील गंगापूर तालुक्यामधील काकासाहेब दत्तात्रय शिंदे या 28 वर्षाच्या युवकाने गोदावरी नदीत उडी मारुन जीव दिला. आरक्षणाअभावीच राज्यसेवा उत्तीर्ण असलेले विद्यार्थी स्वप्नील लोणकर या विद्यार्थ्यांने पुणे येथे आत्महत्या केली. आरक्षणाच्या स्थगीतीमुळेच बिड जिल्हातील केतुरा येथिल कल्याण रहाडे हा विद्यार्थी नीट ची तयारी करत होता. पण परिस्थिती अभावी खाजगी कॉलेजमध्ये प्रवेश घेऊ शकत नव्हता. परिणामी नैराश्यतुन स्वत:ला संपविले. उस्मानाबाद जिल्हातील देवळाली तालुक्यातील अक्षय

शहाजी देवकर या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. दहावीमध्ये यास 94 टक्के गुण होते पण दुष्काळी अभावी तो पुढील शिक्षण घेऊ शकत नव्हता. अशा प्रकारे आजपर्यंत 40 जणांनी मराठा आरक्षणासाठी आपले बलिदान दिले आहे. या अनुषंगाने, महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाची मागणी आणि सकल मराठा मोर्चाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधन साहित्याचा आढावा :-

आरक्षण निती : एक समाजशास्त्रीय विश्लेषण – उइके रामसिंग
डॉ. हरिसिंग गौर युनिव्हर्सिटी, सागर मध्य प्रदेश.

The intra structure of the Maratha caste – suryavanshi, G. S.
Savitribai phule university pune.
Surwanshi G.S. has deliberated about Maratha Castes History,origin, development and caste structure in his research.

आरक्षण व्यवस्था एवं पिछडावर्ग एक समाजशास्त्रीय अध्ययन
(जनपत मिर्झापूर के 500 परिवारोंके अध्ययनपर आधारित एक समाजशास्त्रीय विश्लेषन)

- **प्रकाश सिंग**
  व्ही. बी. एस . पुर्वांचल युनिव्हर्सिटी जैनपूर उत्तर प्रदेश.

OBC Political formations in Maharashtra

- **Madhukar lata, prathibha**
- **Tata institute of. Social science Mumbai**
- **Madhukar Lata in her Research has given a lengthy discussion on the political reservation of OBCs in Maharashtra.**

Impact of Reservation policy on right to equality in india A study of Judical trends

- **Niraj Saini**
- **Maharshi Dayanand university Aajmer**
- **Niraj Saini has studied the effect of reservation policy on the basis of inequality in india in a judicial tendency.**

संत तुकाराम महाराज :-

संत तुकाराम महाराज आपल्या साहित्य रचनेमध्ये म्हणतात !! बरे झाले देवा कुणबी झालो !! नाहीतर दंभेची असतो मेलो !! यावरुन मराठा आणि कुणबी - मराठा ह्या दोन्ही जाती एकच आहेत हे स्पष्ट होते.

व्यंकटेश पाटील :-

यांनी मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमिवर " मराठा आरक्षण भुमिका आणि वास्तव". या संशोधनपर पुस्तकाच्या लिखानातुन मराठा समाज आरक्षणासाठी कसा पात्र आहे हे निकष दिलेले आहेत.

पुरूषोत्तम खेडेकर :-

यांनी आपल्या "मराठा आरक्षण" या संकलनात्मक शोध लेखनात मराठा समाजाची वास्तविक परिस्थिती रेखाटलेली आहे.

मा.न्या.पी.बी. सावंत :

आरक्षणासाठी कुठल्याही एका जातीचा विचार केला जात नाही तर सामाजिक आणि आर्थिक दारिद्रयाचा मुद्दा विचारात घेतला जातो. विशिष्ट जात, धर्माकरिता आरक्षणाचा कोटा राखिव ठेवता येत नाही. अश्यावेळी इतर मागास वर्गाचा आधार घ्यावा लागेल.

माजी न्या. पी.जी कोळसे पाटिल :-

मराठा समाजाला आरक्षण द्यायचे असेल तर सर्वोच्च न्यायालयाचा 50 टक्के हुन अधिक आरक्षण न देण्याचा निर्णय संसदेच्या माध्यमातून बदलून घ्यावा लागेल.

संशोधनाची उद्दीष्ठये :-

महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाची मागणी आणि सकल मराठा मोर्चाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास
या संशोधनात्मक प्रबंधासाठी संशोधकाने काही उदिष्टठे समोर ठेवले आहेत. उदिष्ठाशिवाय संशोधन पुर्णत्वास जाऊ शकत नाही.

1. महाराष्ट्रातील मराठा आरक्षण मागणी संदर्भात सकल मराठा मोर्चाचा भुमिकेचा अभ्यास करणे.
2. मराठा आरक्षण चळवळीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.
3. मराठा आरक्षण संदर्भात. भारतीय संविधानतील घटनात्मक तरतुदीचा अभ्यास करणे.
4. मराठा आरक्षणासाठी निर्माण झालेल्या सामाजीक चळवळीचा अभ्यास करणे.
5. मराठा आरक्षण संदर्भात विविध तज्ञ, नेते, चळवळी, संघटना, व समीत्यांचा अभ्यास करणे.
6. मराठा आरक्षण संदर्भात घटनात्मक व न्यायालयाचा निर्णयाचा अभ्यास करणे.
7. महाराष्ट्रातील मराठा समाजाची शैक्षणीक, सामाजीक, आर्थिक परिस्थीतीचे अधयन करणे.

संशोधन गृहितके :

1. महाराष्ट्रात मराठा आरक्षण मागणी साठी सकल मराठा समाज आक्रमक आहे.

2. मराठा आरक्षणाची मागणी भारतीय स्वांतत्रोत्तर काळापासुनची आहे.

3. भारतीय संविधानानांने सामाजीक, शैक्षणिक, आर्थिक दृष्टया मागास संवर्गाना आरक्षणाची तरतुद केली आहे.

4. मराठा आरक्षणासाठी विविध सामाजीक संघटना सर्व पक्षिय नेत्यांनी मराठा आरक्षणाची मागणी केली आहे.

5. महाराष्ट्रातील मराठा समाज हा शैक्षणिक सामाजिक आर्थिक दृष्ट्या मागास आहे.

6. मराठा आरक्षणासाठी घटनात्मक आरक्षणाच्या मर्यादेची अडचण येत आहे.

अध्ययण क्षेत्र :- मर्यादा

संशोधकाने महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाची मागणी आणि सकल मराठा मोर्चाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास_या शिर्षका अंतर्गत संशोधनात्मक लिखाण करावयाचे ठरवले आहे. संशोधनला अधिक व्यापक व विस्तृत स्वरुप प्राप्त करुन देण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राची मराठा आरक्षणासंदर्भात् गरज लक्षात घेता, महाराष्ट्र हे अध्ययन क्षेत्र निवडलेले आहे.

संशोधन पद्धती :-

सामाजीक शास्त्रात संशोधन करताना कोणत्या ना कोणत्या दृष्टीकोणाचा व्दारे अभ्यास करावा लागतो त्या शिवाय अध्ययन पूर्णत्वास जाऊ शकत नाही. म्हणुन या प्रबंधाच्या अध्ययनासाठी प्राथमिक साधने आणि दुय्यम साधने. (PRIMARY DATA) आणि (SECONDARY DATA) वापर केला जाणार आहे.

संशोधन आराखडा :-

महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाची मागणी आणि सकल मराठा मोर्चाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास या संशोधन प्रबंधासाठी संशोधकाने वर्णनात्मक, व अनवेशणात्मक संशोधन आराखड्याची निवड केली आहे. त्यामागील हेतु असा आहे की या आराखडा प्रकाराव्दारे मराठा समाजाचा पुर्व इतिहास आणि वास्तव परिस्थितीचा अभ्यास करता येईल.

तथ्य संकलन :-

संशोधकाने महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाची मागणी आणि सकल मराठा मोर्चाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास या प्रबंध लेखनासाठी मराठा आरक्षणाविषयीची मागणी संशोधन प्रबंधासाठी समाजाची वास्तविकता शोधण्यासाठी आपल्या अभ्यासात पुढील तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग केला आहे.

1. प्राथमिक तथ्य संकलन पद्धती :-

संशोधकांने महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाची मागणी आणि सकल मराठा मोर्चाची भूमिका एक चिकित्सक अभ्यास या प्रबंध लेखासाठी मराठा आरक्षणा विषयी संबंधीत तज्ञ, वकिल, नेते, विविध समीतीचे अध्यक्ष, सदस्य व समन्वयक, यांच्याशी प्रत्यक्ष मुलाखत घेऊन प्रश्नावली व अनुसूचीव्दारे माहीती संकलीत करणार आहे.

2. व्दीतीय तथ्य संकलन पद्धती :-

संशोधक संशोधन कार्य पुर्ण करण्यासाठी व्दीतियक तथ्य संकलन पद्धतीचा वापर करणार आहे. यामध्ये विविध प्रकाशीत लेख, आरक्षणासंदर्भ्रात संदर्भ ग्रंथे. साहीत्य, प्रकाशित, अप्रकाशीतसाहीत्य, लेख मासीके, साप्ताहीके, वर्तमानपत्रे, विवीध विभागाचे अहवाल, इंटरनेट, शोधप्रबंध. इत्यादि माधमाव्दारे माहीती संकलीत करणार आहे.

प्रकरण योजना (अनुक्रमाणिका) :

1. **प्रकरण पहीले - प्रस्तावना.**

    या प्रकरणामध्ये आरक्षणाचा इतिहास अनुसुचीत जाती अनुसुचित जमाती ओ.बी.सी. यांना दिलेले आरक्षण तसेच आरक्षणाबात छत्रपती शाहु महाराज, महात्मा ज्योतीबा फुले डॉ. पंजाबराव देशमुख यांचा विचारांचा आढावा घेतला आहे.

2. **प्रकरण दुसरे -संशोधन पद्धती.**
    प्रस्तृत शोधप्रबंधाच्या अनुषंगांने संशोधनाची उदिष्टये, गृहितके, विषय निवड, संशोधन मर्यादा, नमुनानिवड आराखडा माहिती प्रकाशीत, अप्रकाशीत ग्रंथे शोधनिबंध अहवाल लेखन साहित्याचा आढावा घेतला आहे.

3. **प्रकरण तिसरे - मराठा समाजाची सामाजीक, शैक्षणीक, आर्थिक परिस्थीतीचा अभ्यास.**
    या प्रकारणामध्ये मराठा समाजाची पार्श्वभुमि तसेच मराठा समाजाच्या सामाजीक, शैक्षणिक, आणि आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतला आहे.

4. **प्रकरण चौथे – मराठा आरक्षण सामाजीक चळवळी व विविध संघटनाचा अभ्यास.**
    या प्रकराणामध्ये मराठा आरक्षण संदर्भात विविध सामाजिक चळवळी, संघटना तसेच समित्यांचा आढावा घेतला आहे.

5. **प्रकरण पाचवे – मराठा आरक्षण गरज आणि वास्तविकता.**
    प्रस्तुत शोधप्रबंधाच्या अनुषंगाने मराठा आरक्षणाची गरज आणि वास्तविकता यांचा आढावा या प्रकरणामध्ये घेतला आहे.

6. **प्रकरण सहावे - निष्कर्ष शिफारशी**
    महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाची मागणी आणि सकल मराठा मोर्चाची भुमिका एक चिकीत्सक अभ्यास या शोधप्रबंधात मराठा समाजाच्या आरक्षण मागणीचा आणि सकल मराठा मोर्चाचा भुमिकेचा विविध अंगाने अभ्यास करण्यात येणार आहे. या

संशोधनाअंती काढण्यात येणारे निष्कर्ष व शिफारशी या प्रकरणामध्ये मांडले जाणार आहेत.

संदर्भ ग्रंथ सुची

1. संपुर्ण तुकाराम गाथा – अभंग क्रमांक 114
2. मराठा आरक्षण भुमिका आणि वास्तव – व्यंकटेश पाटील – ज्योतीचंद्र प्रकाशन लातूर,2014
3. मराठा आरक्षण भ्रम की वास्तव – हनुमंत उपरे – संकेत प्रकाशन नागपूर, 1 जाने. 2014
4. मंडळ आयोग शोध आणि बोध – प्राध्यापक डॉ. नागोराव कुंभार – नालंदा प्रकाशन, पृ.क्र.113
5. मंडळ आयोग रिपोर्ट – भारत सरकार व्दारा प्रकाशित 1980 पिछडावर्ग और सामाजिक व शैक्षणिक न्याय बहुजन पब्लीकेशन ट्रस्ट नवी दिल्ली.
6. भारतीय संविधान एंव राज्यव्यवस्था – उदयभानसिंग – प्रभात प्रकाशन नवी दिल्ली.
7. मराठा आरक्षण फायदे आणि प्रक्रिया – बाळासाहेब सराठे- संकेत प्रकाशन – पृ.क्र.16,17
8. भारतीय राजनीती, दृष्टी डेली न्युज मराठा आरक्षण असंवैधानिक- सवोच्च न्यायालय -7 मे 2021
9. मराठा आरक्षण – लढा सामाजिक न्यायाचा – बाळासाहेब सराठे- संकेत प्रकाशन
10. मराठा क्रांती मोर्चा वृतांत व विश्लेषण – नामदेव पवार – हर्मिस प्रकाशन,2017
11. मराठा आरक्षणाचा खुन – बापट आयोग- पुरूषोत्तम खेडेकर – जिजाई प्रकाशन, 2009
12. मराठा आरक्षण का ? व कशासाठी ? – स्वप्नील घुमरे – पंचफुला प्रकाशन 2015

- संशोधक – **- मार्गदर्शक-**

जाधव संतोष दत्तराम
एम.ए.,बी. एड. सेट
(राज्यशास्त्र)

प्रा.डॉ. बी.एल. डोंगरे
एम. ए. पी.एचडी. नेट

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयंवतराव पाटील. महाविद्यालय हिमायतनगर